आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२५

ठळक बातम्या

1. संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावर चर्चा.
2. महाराष्ट्राला 20 पटीने जास्त म्हणजे 23 हजार 775 कोटी रुपये या अर्थसंकल्पात रेल्वे प्रकल्पासाठी मिळाले - रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दूरदृश्य प्रणाली मार्फत दिली माहिती.
3. अकोल्याच्या 'व-हाडी जत्रा सरस प्रदर्शनातून व-हाडच्या सांस्कृतिक-समृद्धीचे दर्शन.
4. गडचिरोली इथल्या नक्षलवाद्यांचे प्रशिक्षण स्थळ असलेल्या नेलगुंडा गावात 1500 गडचिरोली पोलिसांनी 24 तासांच्या विक्रमी वेळेत उभारले पोलिस स्टेशन.

------------------------------------

संसद

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभ मेळाव्यात झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेवरुन आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे प्रचंड गदारोळ झाला. महाकुंभ व्यवस्थापनात ढिसाळपणा झाल्याचा आरोप करत लोकसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अभिभाषणात या दुर्दैवी घटनेचा उल्लेख केला होता. अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान सदस्यांना आपलं म्हणणं मांडता येईल असं सभापती ओम बिरला यांनी सांगितलं. त्यानंतर लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल च्या आभार प्रस्तावावर चर्चा सुरु झाली आहे. भाजपाचे रमेश बिधुडी यांनी चर्चेचा प्रारंभ केला. राज्यसभेतही आभारप्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात झाली. भाजपाच्या किरण चौधरी यांनी चर्चेला प्रारंभ केला. शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकारने व्यापक उपाययोजना केल्या असून विरोधक यासंदर्भात अपप्रचार करत आहेत असं त्या म्हणाल्या. राज्यसभेत कामकाज सुरु झाल्यावर महाकुंभाच्या मुद्द्यावरुन विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. या आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधकांनी दिलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळले. त्याच्या

निषेधात काँग्रेस, समाजवादी पार्टी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि इतर पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला.

-------------------------------------

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

महाराष्ट्राला 20 पटीने जास्त म्हणजे 23 कोटी 775 रुपये या अर्थसंकल्पात रेल्वे प्रकल्पासाठी मिळाले आहेत अशी माहिती आज केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. मध्य रेल्वेच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापकांच्या उपस्थितीमध्ये रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव सध्या महाराष्ट्रातील रेल्वे तरतुदींविषयी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून माहिती देत आहेत .नागपूर मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक विनायक गर्ग हे नागपूर विभागाच्या पत्र परिषदेत उपस्थित आहेत. त्यांनी पुढे सांगितले की 2हजात 103 किमी लांबीचे नवे रेल्वे ट्रॅक्सचे जाळे राज्यात निर्माण झाले जे मलेशियाचे एकूण रेल्वे नेटवर्कपेक्षा जास्त आहे. 1 लाख 16 हजार कोटी रुपये रेल्वे सुरक्षेसाठी तरतूद करण्यात आली आहे असे देखील त्यांनी सांगितले. तत्पूर्वी, अर्थसंकल्पामध्ये रेल्वे मंत्रालयाच्या दक्षिण मध्यपूर्व रेल्वेच्या विभागीय मंडळांच्या रेल्वे तरतुदींविषयी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्लीवरून व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून आज दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागीय मंडळ रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली. याप्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता उपस्थित होते . दक्षिण पूर्व रेल्वे विभागाच्या अंतर्गत 92 रेल्वे स्थानकापैकी 30 स्थानक हे दिव्यांग जणांना सुलभ आणि सोयीस्कर करणार असल्याच यावेळी रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितल.याप्रसंगी अमृत भारत स्टेशन च्या प्रगती विषयी सुद्धा या अधिकाऱ्यांनी माहिती दिली

होल्ड बाईट (रेल्वे ऑफिसर 20 सेकंद)

*हम लोग के यहाँ १५ स्टेशन है। १५ में से तीन कंप्लीट हो गया है इतवारी ,आमगाव ,चांदपुर और अभी फरवरी में तीन स्टेशन और कंप्लीट हो रहा है। डोंगरगढ़, सिवनी और वडसा और फिर मार्च में भी वैसे ही तीन चार ऐसे करके है। मतलब फुल प्लान ये है की मई तक हमारे सारे १५ स्टेशन कंप्लीट हो जाते हैं।*

दक्षिण पूर्व रेल्वे अंतर्गत 15 गुड शेड्स निर्माणाधीन असून त्यामध्ये तुमसर , वडसा, आमगाव ,कळमना या महाराष्ट्रीतील स्थानकांचा समावेश असल्याची माहिती सुद्धा देण्यात आली.

------------------------------------

## सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 चा प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी नागपूर विभागातील सर्व जिल्हयांची बैठक उमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली. जिल्हा वार्षिक योजनेचा (सर्वसाधारण) सन 2025-26 साठी शासनाने कळविलेल्या आर्थिक मर्यादेत नागपूर विभागाचा 1 हजार 763 कोटी 70 लक्ष रूपयांचा आराखडा सादर करण्यात आला. नागपूर विभागातील जिल्हयांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2025-26 च्या प्रारूप आरखड्यास जिल्हा नियोजन समितीची शासनाने कळविलेल्या आर्थिक मर्यादेत मान्यता घेतली आहे. यानुसार नागपूर जिल्हयासाठी 509.6 कोटी, वर्धा 207.22 कोटी, भंडारा 173.27 कोटी, गोंदिया 198.51 कोटी, चंद्रपूर 340.88 कोटी तर गडचिरोली जिल्हयासाठी 334.76 कोटी रूपयांच्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक आराखडा सादर करण्यात आला आहे.

------------------------------------

## व-हाडी जत्रा

'व-हाडी जत्रा सरस प्रदर्शन' व-हाडच्या सांस्कृतिक समृद्धीचे दर्शन घडविणारे असून, खेड्यापाड्यातील महिला भगिनींच्या बचत गटांना या माध्यमातून व्यासपीठ मिळाले आहे. जिल्हयात बचत गटांच्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज अकोल्यात दिली. सहभागी झालेल्या वैशाली देशमुख यांनी आपला अनुभव सांगितला.

(सहभागी झालेल्या वैशाली देशमुख यांनी आपला अनुभव सांगितला - होल्ड बाईट २६ सेकंड )

*आमचा गाळेगाव सहयोग सह सहायता समूह आहे पात्रही आमचा क्लस्टर आहे अकोल्याला जी जत्रा भरवली आहे महिलांसाठी उमेदच्या माध्यमातून खूप चांगला प्रतिसाद मिळतो आहे कालचा पण सर्वात चांगला प्रतिसाद होता उमेदनी या अभियाण्यांनी छोटया रोजगाराला खूप मोठी संधी दिलेली आहे त्याच्यामुळे आमच्या गटाची जी आहे उमेद मॅट ला पण आम्ही अटॅच झालेलो आहे आमचे नऊ चे उमेद मॅट पण आता विकले जाणार आहे.*

या उपक्रमात अकोला जिल्हयातील अनेक महिला स्वयंसहाय्यता गटांनी सहभागी होऊन विविध उत्पादने जत्रेत प्रदर्शित केली आहेत. पालकमंत्र्यांनी विविध कक्षांना

भेट देऊन महिला भगिनींशी संवादही साधला. जिल्ह्यातील बचत गटांनी शाश्वत विकासाकडे वाटचाल करावी. बचत गटांना कायमस्वरूपी बाजारपेठ मिळण्यासाठी महिला बचत गट उत्पादनांचे विक्री भवन व्हावे. त्यासाठी निश्चित प्रयत्न करू, असे पालकमंत्र्यांनीही यावेळी सांगितले. शास्त्री क्रीडांगणावर सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत जत्रा सर्वांसाठी खुली आहे.

-----------------------------------

गडचिरोली पोलीस स्टेशन

गडचिरोली मध्ये घनदाट जंगलात पोलिसांनी अथक प्रयत्न करून, एका दिवसात पोलीस स्थानक सुरू केले आहे. गडचिरोली पासून 200 किलोमीटर अंतरावर तब्बल एक हजारापेक्षा अधिक पोलीस कर्मचाऱ्यांनी नेलगुंदा येथे जाऊन पोलीस ठाणे सुरू केले आहे. त्यामुळे माओवाद्यांसाठी त्यांचे प्रशिक्षण स्थळ आणि त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीन महत्त्वपूर्ण असलेल्या दोन राज्याच्या सीमावर्ती असलेला हा भाग, सुरक्षा दलाच्या कक्षेत आलाय.'गडचिरोली येथील नक्षलवाद्यांचे प्रशिक्षण स्थळ असलेल्या नेलगुंडा गावात 1500 गडचिरोली पोलिसांनी 24 तासांच्या विक्रमी वेळेत पोलिस स्टेशन उभारले. या अभूतपूर्व कामगिरीसाठी ‘गडचिरोली पोलिसांचे अभिनंदन 'असा संदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या समाज माध्यमावरून दिला आहे. यावेळी नेलगुंडाच्या सर्व गावकऱ्यांनी आनंद व्यक्त करत पोलिसांचे अभिनंदन केले.

-----------------------------------

नक्षल्यांचे आत्मसमर्पण

सुमारे २८ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या दोन नक्षल दाम्पत्यांनी आज गडचिरोली जिल्हा पोलिस आणि केंद्रीय राखीव दलापुढे आत्मसमर्पण केले. यात एक विभागीय समिती सदस्य, एक एसीएम (ACM) आणि दोन दलम सदस्यांचा समावेश आहे.

अशोक पोचा सडमेक उर्फ बालन्ना उर्फ चंद्रशेखर , वनिता दोहे झोरे’ साधू लिंगू मोहंदा उर्फ शैलेश उर्फ समीर आणि मुन्नी पोदिया कोरसा अशी आत्मसमर्पण केलेल्या नक्षलींची नावे आहेत. या पैकी अशोक सडमेक अहेरी तालुक्यातील अर्कापल्ली येथील मूळ रहिवासी असून त्याच्यावर ८२ गुन्हे दाखल आहेत. शासनान त्याच्यावर १६ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

-----------------------------------

प्रबोधन कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (PM-UShA) अंतर्गत युवांसाठी उद्योजकतेचा प्रवास' या विषयावर ४

ते ६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत तीन दिवसीय प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन गुणवत्ता हमी कक्ष (IQAC), अर्थशास्त्र विभाग, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन (VIA) आणि इनफेड, इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर यांच्या सहकार्यान आयोजित करण्यात येत आहे. कार्यशाळेचे आयोजन औषधी निर्माण शास्त्र विभागातील डॉ. ए. के. डोरले सभागृह येथे करण्यात आले आहे.

-------------------------------------

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत  काल सहाव्या दिवशी विविध संघांनी आपल्या खेळाचं शानदार प्रदर्शन केलं. सेना दल संघ आणि कर्नाटकला प्रत्येकी १७ सुवर्ण मिळाले आहेत. मात्र सेना दल संघाला १० रौप्य आणि ८ कांस्य तर कर्नाटकला ९ रौप्य आणि ९ कांस्य पदकं असल्यान सेना दल संघ पदकतालिकेत पहिल्या स्थानावर आहे, तर कर्नाटक दुसऱ्या स्थानावर आहे. तर महाराष्ट्र १३ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र २३ रौप्य आणि १६ कांस्य पदकं जिंकून महाराष्ट्रान सर्वाधिक ५२ पदकं जिंकली आहेत.मणिपूर ११ सुवर्ण पदकांसह चौथ्या तर मध्यप्रदेश ९ सुवर्ण पदकांसह पाचव्या स्थानावर आहे.तामिळनाडू  आणि हरियाणानही स्पर्धेत चांगल्या खेळाचं प्रदर्शन केलं आहे. तामिळनाडून ८ तर हरियाणान ६ सुवर्ण पदकं जिंकली आहेत. याशियाव केरळ, दिल्ली आणि उत्तर प्रदेश चे संघ देखील  पदकतालिकेत पहिल्या दहा संघामधे आहेत. यजमान उत्तराखंडच्या खात्यात आतापर्यंत केवळ एक सुवर्ण पदक पडलं आहे.

-------------------------------------